महाराष्ट्र शासन

**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☏२२७९५९००

फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☏२२१०२२२२

Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक : १४४२(२)(२)/२०१९/तेवीस दिनांक : १८ फेब्रुवारी, २०२२.

**-: प्रसिध्दीपत्रक :-**

**विषय : महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित गट-ब (मुख्य) परीक्षा-२०१९- पोलीस उपनिरीक्षक मधील शारीरिक चाचणीसाठी वैद्यकीय कारणास्तव मुदतवाढ देण्याची विनंती केलेल्या उमेदवारांचा शारीरिक चाचणी व मुलाखतीचा कार्यक्रम.**

**संदर्भ : १. जाहिरात क्रमांक ०१/२०१९ व अधिसूचना क्र.०८/२०१९**
**२. आयोगाचे दिनांक १५ फेब्रुवारी, २०२२ रोजीचे प्रसिद्धीपत्रक.**

महाराष्ट्र दुय्यम सेवा, अराजपत्रित गट-ब (मुख्य) परीक्षा - २०१९ (पोलीस उपनिरीक्षक) मधील शारीरिक चाचणीसाठी वैद्यकीय कारणास्तव मुदतवाढ देण्याची विनंती करणा-या उमेदवारांचा शारीरिक चाचणी व मुलाखतीचा कार्यक्रम दिनांक २२ व २३ फेब्रुवारी, २०२२ रोजी **राज्य राखीव पोलीस बल, गट क्रमांक १, रामटेकडी, पुणे** येथे घेण्याचे निश्चित करण्यात आला आहे. त्यानुसार दिनांक १५ ते १८ फेब्रुवारी, २०२२ या कालावधीमध्ये लातूर व अमरावती येथे आयोजित शारीरिक चाचणीच्या वेळी वैद्यकीय कारणास्तव मुदतवाढ मागणा-या उमेदवारांनी शारीरिक चाचणीकरीता सदर मैदानावर **दिनांक २३ फेब्रुवारी, २०२२ रोजी सकाळी ६.३० वाजता** उपस्थित राहावे. याबाबतचे शारीरिक चाचणीचे पत्र उमेदवारांना त्यांच्या प्राफाईलवर पाठविण्यात येईल.

२. वैद्यकीय कारणास्तव शारीरिक चाचणीसाठी मुदतवाढ देण्यात आलेल्या व या मुदतवाढीच्या कार्यक्रमास उपस्थित राहणा-या उमेदवारांनी शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त असल्याबाबतचे वैद्यकीय प्रमाणपत्र (Medical Fitness Certificate) त्याचदिवशी सादर करणे अनिवार्य राहील. अन्यथा त्यांची शारीरिक चाचणी घेतली जाणार नाही.

३. प्रस्तुत परीक्षेच्या वैद्यकीय कारणास्तव मुदतवाढ घेतलेल्या उमेदवारांच्या शारीरिक चाचणीचा सदर कार्यक्रम अंतिम असून प्रस्तुत प्रकरणी यानंतर शारीरिक चाचणीकरिता मुदतवाढ मिळण्याबाबतची कोणतीही विनंती विचारात घेतली जाणार नाही.

**उप सचिव (परीक्षोत्तर) (अप)**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग,**

**ठिकाण - मुंबई.**